(9) Dr. Shivaji Diwan (Pol. sci.)

ISSN 2394- 5303

# PRiNTiNG Area®

Issue-72, Vol-02 January 2021

Peer Reviewed International Refereed Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

**January 2020, Issue-72, Vol-02**

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) A study on Financial Soundness Indicators of HDFC Bank and SBI
**Dr. Vivek Shankar, Bodh Gaya, Bihar** ||57

15) केशवसुत आणि बालकवींच्या कवितांमधील शेती संस्कृती मूल्य व ग्रामीण जाणिवा
**मोरे गुणवंत व्यंकटराव, नांदेड** ||61

16) आदिवासी कुटुंब व्यवस्था व आदिवासी स्त्री
**डॉ. मुक्ता राजेंद्र आंभेरे, जि. पुणे** ||64

17) महाराष्ट्रातील आदिवासी कोलाम जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन
**प्रा.डॉ.एस.जी. अन्सारी, जि.लातूर** ||69

18) भारताचे परराष्ट्र धोरण आणि सद्यःस्थिती
**प्रा. डॉ. शिवाजी दिवान, जि. बीड** ||72

19) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कृषी व जलनिती
**प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड, लातूर** ||74

20) एकविसाव्या शतकातील आंबेडकरवादी कवितेचे स्वरूप
**डॉ. कालीदास गुडदे, पालम** ||78

21) प्रा. गौतम गायकवाड : आंबेडकरी विचारांच एक धगधगत वादळ
**कैलास मच्छिंद्रनाथ होके, जि. बीड** ||81

22) महिला आयोग आणि महिला सुरक्षा समिती
**प्रा.डॉ.सर्जेराव राजाराम कहाळे, जालना** ||83

23) बचतीला प्रभावित करणारे घटक : एक अर्थशास्त्रीय अभ्यास
**प्रा.डॉ.जितेंद्र पांडुरंगराव काळे, जि.नांदेड** ||86

24) महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्या : कारणे आणि उपाय
**प्रा.डॉ.आर.डी.खताळ, जि.बीड (महाराष्ट्र)** ||88

25) REDIRECTING TEACHER EDUCATION : PROBLEMS AND CHALLENGES IN THE ...
**Dr. Sekh Abdul Hakim, Nagaon (Assam)** ||90

26) प्रवासवर्णन वाड्.मयाचे स्वरुप
**प्रा.डॉ.गणपती जोतीबा मोरे, जि.परभणी** ||93

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

18

# भारताचे परराष्ट्र धोरण आणि सद्य:स्थिती

**प्रा. डॉ. शिवाजी दिवान**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड

**भूमिका:**

देशाची सद्यस्थिती ही लष्करी सामर्थ्यापेक्षाही त्या देशाने इतर राष्ट्रांसोबत राजनैतिक पातळीवर केलेल्या कार्यावर अवलंबून असते असे आंतरराष्ट्रीय तज्ज्ञाचं मत आहे. जगात भारताची ओळख शांतताप्रिय राष्ट्र अशी आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भक्कम, स्थिर व नवे सरकार स्थापन झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या नव्या सरकारच्या शपथविधीला सार्कप्रमुख राष्ट्रांना बोलावून विदेश नीतीचे नवे धोरण सुतोवाच केले. भारतातील नवीन सरकार दक्षिण आशियातील राष्ट्रांसोबत नवे संबंध प्रस्थापित करत आहेत, असा संदेश आंतरराष्ट्रीय राजकारणात देण्यात आला. १९९१ नंतर आर्थिक उदारीकरण व जगातील बदलते व्यापारी प्रवाह यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा बदल घडवून आणला. भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी जुळवून घेणारी आहे, अशी भारताची प्रतिमा आंतरराष्ट्रीय पातळीवर झाली. जागतिक स्पर्धेत आगेकूच करण्यासाठी आर्थिक उदारीकरणाचे धोरणस्विकारल्यानंतर भारताने अनेक अडथळ्यांच्या शर्यतीला तोंड देत स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला. जगातील बलाढ्य देशांची अर्थव्यवस्थेत मंदी असली तरी विविध मानांकानुसार भारतीय अर्थव्यवस्था ७.४ टक्के दराने विकास साधत आहे. हे मोदी सरकारच्या मुत्सद्दी धोरणाचे प्रतीक होय.

**भारताचे परराष्ट्र धोरण :**

कोणत्याही देशाची परराष्ट्र नीती ही त्या राष्ट्राची तत्कालीन राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती, पारंपारिक विचारधारा, त्या राष्ट्राचे हितसंबंध व गरजा तसेच तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थिती यातून साकार होते. राष्ट्राचे हित संवर्धन व्हावे हा एकमेव उद्देश परराष्ट्र धोरणासमोर असतो. भारतीय परराष्ट्र धोरणांचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मतानुसार, भारत की विदेशी नीती की जडे भारत की सभ्यता और परंपराओं में भारत के स्वतंत्रासंग्राम, इसकी भौगोलिक स्थिती में और शांती, सुरक्षा विकास तथा जगत में एक स्थान के लिए भारत की तलाश में स्थित हैं ।१ शांतताप्रिय भारत आणि विविधतेने नटलेल्या पारंपारीक व सांस्कृतिक, स्वातंत्र्यसंग्रामातील संघर्ष, विविधपूर्ण भौगोलिक स्थिती, प्रत्येक नागरिकांची सुरक्षा व विकास आणि जगात भारताला उच्च स्थान निर्माण करणे हेच भारताच्या परराष्ट्र धोरणचं मुळं आहे. ४ डिसेंबर १९४७ रोजी घटना समिती पुढे बोलताना पंडित जवाहरलाल नेहरू म्हणले की, राष्ट्रहिताला कोणती नीती सर्वाधिक पोषक ठरेल हे अचूक ओळखून त्या दृष्टीने धोरण निश्चित करणे. हेच परराष्ट्र धोरणाचे प्रमुख कार्य होय.२ राष्ट्रहित हे एकमेव ध्येय ठेवत त्या दृष्टीने कार्य करणे. भारताची परराष्ट्रनीती ही स्वातंत्र्यानंतर निश्चित केली.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये :**

१. आपल्या प्रादेशिक अखंडत्वाचे व अबाधित्वाचे संरक्षण करणे.

२. जागतिक शांतता टिकवून आंतरराष्ट्रीय सहकार्य वृध्दिंगत करण्यासाठी प्रयत्न करणे.

३. धोरण निर्धारणाचे स्वातंत्र्य टिकवणे.

४. सर्व राष्ट्रांशी मैत्रीसंबंध टिकवणे, सहकार्य प्रस्थापित करणे.

५. भारताचा आर्थिक विकास साधणे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी डिसेंबर २०१५ पर्यंत आपल्या वीस महिन्यांच्या कार्यकाळात ३० राष्ट्रांना भेट दिली.३ यात विकसित व विकसनशील राष्ट्रांचा समावेश आहे. सर्वच क्षेत्रात सर्व बाजूंनी सुधारणा होत असल्या तरी सरकारचे मुख्य यश आंतरराष्ट्रीय संबंधात आहे. प्रत्येक राष्ट्रासोबत सलोख्याचे संबंध निर्माण करत भारताने आंतरराष्ट्रीय संबंधात वेगही प्रतिमा निर्माण करून नवीन उंची गाठली आहे.

**परराष्ट्राचे नेतृत्व :**

परराष्ट्र धोरणात अंमलबजावणी व निर्मितीसाठी व्यक्ती महत्त्वाच्या असतात. देशातील परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून त्या व्यक्तीच्या करिश्माभोवती परराष्ट्र धोरण आपलं वेगळं स्थान निर्माण करत असतं. सुषमा स्वराज, स्वर्गीय इंदिरा गांधीनंतरच्या पहिल्या महिल्या विदेश मंत्री, लोकसभेतील माझी विरोधी पक्ष नेत्या, परराष्ट्र मंत्रालय स्वीकारल्यापासून आपल्या वीस महिन्याच्या कार्यकाळात एकूण २९ राष्ट्रांना त्यांनी भेटी दिल्या. मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणाचे पहिल्या १०० दिवसांचे कार्य (Fast Track Diplomacy) फास्ट ट्रॅक डिप्लोमसी ही पुस्तिका सुषमा स्वराज यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली.४ सुब्रमण्यम जयशंकर अमेरिकेतील भूतपूर्व भारतीय

राजदूत होय. २६ जानेवारी २०१५ रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या यशस्वी भारत भेटीनंतर भारताचे परराष्ट्र सचिव म्हणून बढती देण्यात आली. अजित कुमार डोवल भारताचे पाचवे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून ३० मे २०१५ रोजी निवड करण्यात आली. त्यांनी पाकिस्तान मध्ये सात वर्ष गुप्तरीतया काम केलं आहे.५ सुरक्षा संदर्भात अनेक घटनेत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**भारत आणि शेजारील राष्ट्रे :**

नरेंद्र मोदींनी पंतप्रधान पदाची शपथ घेण्यापूर्वीच शेजारी राष्ट्रांना शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण देऊन सर्वोत्कृष्ट व धडाडीचे पाऊल टाकत आपल्या नव्या सरकारच्या कारकीर्दीची सुरूवात केली. हा शपथविधी सोहळा म्हणजे प्राथमिक संपर्क जोडण्याचा मार्ग त्याद्वारे आंतरराष्ट्रीय परिषदेतून अनेक भेटी आणि भेटीद्वारे चर्चा, देवाणघेवाण ही एक उत्तम संधी ठरली. ऑगस्ट २०१४ रोजी नरेंद्र मोदींनी नेपाळला भेट दिली. ही भेट अनेक अर्थाने ऐतिहासिक ठरली. सतरा वर्षानंतर भारतीय पंतप्रधानांनी ही भेट दिली. नेपाळमध्ये भूकंप झाला भारताने वेळ न गमावता ताबडतोब लष्कर पाठवून भूकंपामुळे ढिगा-याखाली अडकलेल्या अनेकांना बाहेर काढून मदतकार्य केले. भारताने दिलेले आश्वासन पाळत नेपाळमध्ये अनेक प्रकल्पांचे काम सुरू आहे.

स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी बांग्लादेशाच्या स्वातंत्र्य संग्रामात मोलाची भूमिका बजावली. १९७४ पासून भूसीमा भारत आणि बांग्लादेशातील करार प्रलंबित होता. नरेंद्र यांच्या कार्यकाळात ४०९६ कि.मी. सीमा रेषेचा प्रश्न सोडवला आणि ५० हजार जनतेला नवीन ओळख मिळाली. त्यामुळे बंडखोरांच्या कारवाया, मानवी कारवाया, मानवी व्यापार, अवैध घुसखोरी, तस्करी रोखण्यात सीमेची निर्मिती महत्वपूर्ण ठरली.६ अफगाणिस्तानमधील सद्यस्थिती ही भारताच्या दृष्टिकोनातून चिंतित आहे. अफगाणिस्तानमधील राजकीय बदलामुळे नाटो सैन्य अता माघार घेत आहेत. तेथील राजकीय स्थैर्य आणि मैत्री भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात द्विपक्षीय करार झाला आहे. त्यानुसार भारताने २०० कोटी डॉलर अफगानिस्तांतनला दिले आहेत. यात पायाभूत सुविधा, विकास, लोकशाही बळकट करणे आणि देशातील राजकीय स्थैर्य टिकविणे हा या मागचा हेतू आहे. जानेवारी २०१५ मध्ये श्रीलंकेत नवीन सरकार आले. श्रीलंकेत मैत्रीपाल सिरिसेना सरकार स्थापन करण्यात भारतीय इंटेलिजन्स RAW ची प्रमुख भूमिका होती.७ दोन्ही देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची भेट झाल्यानंतर नरेंद्र मोदींनी श्रीलंकेला भेट दिली. १९८७ नंतर भारतीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी श्रीलंकेला १३ मार्च २०१५ रोजी भेट दिली. १९८७ नंतर भारतीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी श्रीलंकेला १३ मार्च २०१५ रोजी भेट दिली. प्रधानमंत्री द्विपक्षीय वार्तालापवर बोलताना म्हणाले की, भारत श्रीलंकेला ३१८ मिलियन अमेरिकन डॉलर कर्ज देऊन श्रीलंकेत केलं आहे.८ भारतीय रिझर्व्ह बँक आणि सेंट्रल बँक ऑफ श्रीलंका यांच्यात १.५ बिलियन अमेरिकी डॉलर मुद्रा विनिमय करार करण्यात आला. यामुळे श्रीलंकेतील रूपया स्थिर राहण्यास मदत होईल.

संस्थापक महंमदअली जिना यांच्या संकल्पनेतून धर्माच्या आधारावर स्वतंत्र पाकिस्तनची निर्मिती केली. परराष्ट्र व्यवहारतलं हत्यार म्हणून आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांना आश्रय देणं, दहशतवादी गटांना तयार करणं, प्रशिक्षण देणं, अर्थपुरवठा करणं, सांभाळणं आणि गरजेनुसार भारताच्या विरोधात छू करून सोडण९ हे तिथल्या राज्यकर्त्यांच्या आणि लष्करी नेतृत्वाचे गुण आहेत. १९८० च्या दशकात पेटवलेली ही आग आता पेटवणा-यांनाच भस्म करू पाहत आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात वादाचे मुद्दे कश्मीर, आतंकवाद, प्रभवी भारतीय सैन्य आहे. पाकिस्तानातील आय.एस.आय. मुलतत्ववादी शक्ती व दबाव गट लोकशाही मार्गाने निवडून आलेले दुबळे सरकार, असे पाकिस्तानातील कचे दुवे आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि पाकिस्तानचे प्रधानमंत्री नवाज शरीफ यांच्या डिसेंबर २०१५ पर्यंत एकूण पाच भेटी झाल्या. या भेटी दरम्यान एकूण तीन वेळेस संवाद साधला. १० जुलै २०१५ रोजी ऊफा येथे झालेल्या शघांय कोऑपरेशन ऑर्गनाइजेशन समिटेत दोघांनी भेट पुढील वाटचालींची घोषणा केली.१० सर्वप्रथम दोन्ही देशांच्या सूरक्षा सल्लागारांसोबत दिल्ली येथे आंतकवादावर चर्चा अपेक्षित होती. नंतर विदेश सचिव एकमेकांना भेट देतील.

३० नोव्हेंबर २०१५ रोजी फ्रांसमधील जलवायू परिवर्तन संमेलनात नरेंद्र मोदींनी नवाज शरीफ यांची भेट घेतली. प्रसारमाध्यमातून आलेल्या बातमीनुसार ही भेट अनधिकृत होती व फक्त दोनच मिनीट दोघांनी संवाद साधला.११ या नंतर २५ डिसेंबर २०१५ रोजी प्रधानमंत्री नवाज शरीफ यांच्या वाढदिवसांच्या शुभेच्छा संदेश देण्यासाठी आणि नातीच्या लग्नासमारंभात उपस्थित राहण्यासाठी अचानक पंतप्रधान नरेंद्र मोदी पाकिस्तान धर्तीवर पोहोचले. ही भेट अचानक नसून एक महिन्यापूर्वी झालेल्या दोन मिनिटचे कुटनीती संवादाचे यश होते. या भेटीचे पडसाद भारतात नवीन वर्षाच्या सुरूवातीला पठाणकोट हल्ल्यात दिसले.

**समारोप :**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आक्रमक परराष्ट्र धोरण अंगीकारले आहे. या धोरणामुळे नेहरूंच्या पंचशील धोरणाची जागा आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान, संवाद, समृध्द, संस्कृती आणि सुरक्ष या नीतीने घेतली आहे. भारताने अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, जर्मनी,

कॅनडा यांच्याशी अणुसहकार्याच्या आघाडीवर लक्षणीय प्रगती केली. विदेश नीतिचा मेक इन इंडिया द्वारे भारतीय अर्थव्यवस्थेला हातभार लावून, जगात सर्वात वेगवान वाढणारी अर्थव्यवस्था आणि गुंतवणुकीसाठी सर्वात आकर्षक स्थळ म्हणून झालेली प्रतिमा हे नरेंद्र मोंदी यांच्या विदेश नीतीला लाभलेले यश आहे. अमेरिका, चीन, रशिया या जगातील बलाढ्य देशांशी संबंध जोडताना मोर्दीनी परस्पर हितसंबंधावर भर दिला. लूक इस्ट या नीतीमुळे अनेक राष्ट्रांशी पुन्हा नव्याने संबंध प्रस्थापित करण्यात आले. भारत स्वातंत्र्य होऊन ६८ वर्षे झाले असले तरी नरेंद्र मोदी भारताचे पहिले पंतप्रधान आहेत की, ज्यांनी मॅगोलिया देशाला प्रथम भेट दिली. मंगोलिया हा देश आशिया आणि प्रशांत महासागराच्या दृष्टीने महत्वपूर्ण देश आहे.

**संदर्भ सूची :**

१) दत्त व्ही.पी.- स्वतंत्र भारत की विदेश नीती राष्ट्रीय पुस्तक न्यास, नई दिल्ली-२००९, पृ.क्र.०१.

२) Bulletin Unique Academy-विशेष लेख- परराष्ट्र धोरणाची बदलाची दिशा-दिवाळी विशेषांक नोव्हेंबर -२०१५ पृ.क्र.१४५, १४९.

३) www.mea.gov.in/access २८-०१-२०१६.

४) www.mea.gov.in/access २८-०१-२०१६.

५) www.dainikbhaskar.com/access ११-०१-२०१६.

६) योजना-जुलै २०१५.

७) www.dainkbhaskar.com/access २५/१२/२०१५.

८) प्रधानमंत्री श्रीलंका दौ-यावर असताना प्रसारमाध्यमांशी केलेला संवाद १३ मार्च २०१५.

९) दैनिक सकाळ, दहशतीचा चक्रव्यूह, श्रीराम पवार, सप्तरंग रविवार २४ जानेवारी २०१६, पृ.क्र. ०२.

१०) इंडिया टुडे-२० जानवारी २०१६ पृ.क्र. १३.

११) कित्ता, पृ.क्र. १३.

□□□

19

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कृषी व जलनिती

**प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक व प्रमुख, समाजशास्त्र विभाग,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**********

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक असामान्य, अलौकिक, महत्त्वकांक्षी, जिद्दी, कर्तव्यदक्ष, लोकहितदक्ष महापुरुष आहेत. पारंपरिक विषमताप्रधान समाजव्यवस्था आधुनिक समताप्रधान समाजव्यवस्थेत रूपांतरीत करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य व्यथित केले. म्हणून ते अजरामर झाले. त्यांनी वात्सल्य भावनेतून जनतेवर निस्सीम प्रेम केले. आणि जनतेनेही त्यांना आलोट प्रेम दिले. त्यांचे विचारकर्तृत्व आजही तितकेच प्रेरणादायी आणि दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरते. या सामुदायिक संवेदनशील जाणीवेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती मोठ्या उत्साहात जगभर साजरी केली जाते.

कोरोनाच्या महामारीने संपूर्ण जग त्रस्त बनले आहे. 'घरी रहा सुरक्षित रहा लॉकडाऊनचे सर्वार्थाने पालन करा', या नियमाला अनुसरून आपण सर्वजन डॉ. आंबेडकरांच्या विचारकार्याचे स्मरण, चिंतन, वाचन, मनन कथन करून आगळ्यावेगळया पद्धतीने ही जयंती साजरी करीत आहोत. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी व जलनिती या अनुषंगाने दुय्यम तथ्य सामग्रीच्या आधारावर संबंधीत साहित्याच्या आधारावर विवेचन केले आहे. हे विवेचन पुढील उद्दिष्टांना अनुसरून केले आहे.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक विचार कार्याचा आढावा घेणे.

२) त्यांचे जलनिती विषयक विचार कार्य समजून घेणे.

३) त्यांच्या कृषी विषयक योगदानाचे महत्त्व लक्षात घेणे.

बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्दिक विश्वातील ज्या अनेक मौलिक पदव्या संपादन केल्या आहेत त्या पदव्याकडे नजर टाकली तरी ते एक सैध्दातिक आणि व्यावहारीक या दोन्ही पातळ्यावरून मर्मग्राही, दाहक वास्तवादी विचार करणारे, अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक संशोधक, चिंतक होते. त्यांचा उच्चविद्या विभूषीतपणा अर्थशास्त्रीय पदव्यांनीच द्विगुणीत झाला आहे हे आपल्या लक्षात येते. त्यांनी कोलंबिया